MHAU090028182020

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | १०.१२.२०२० |
| नोंदणी दिनांक | १०.१२.२०२० |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२.०५.२०२६ |
| कालावधी | ०५व. ०४म. २३दि. |

| | |
|---|---|
| | **पैठण येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांच्या न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी- श्री. एच.डी.देशिंगे)**<br>**(घोषीत दिनांक.०२.०५.२०२६)**<br>**नियमित फौजदरी खटला क्रं.४४०/२०२०, निशाणी क्रं.५२**<br>**गु.र.नं.१३८/२०२० पोलीस ठाणे एम.आय.डी.सी पैठण, जि.औरंगाबाद.** |
| फिर्यादी | सरकार |
| अभियांग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्री.ए.आर.शिंदे |
| आरोपी | १. अहमद इब्राहिम शेख,<br>वय - ५९ वर्ष, व्यवसाय-शेती,<br>२. सिराज दुलेखॉ पठाण,<br>वय - ५२ वर्ष, व्यवसाय-शेती,<br>दोघे रा. टाके डोणगांव, ता.पैठण, जि.औरंगाबाद.<br>३. राजू अहमद शेख,<br>वय - ३० वर्ष, व्यवसाय-शेती,<br>४. खाजा अहमद शेख,<br>वय - २६ वर्ष, व्यवसाय-शेती,<br>दोन्ही रा. तारुपिंपळवाडी, ता.पैठण, जि.औरंगाबाद.<br>५. निसार अहमद शेख,<br>वय - २४ वर्ष, व्यवसाय-शेती,<br>रा. टाके डोणगांव, ता.पैठण, जि.औरंगाबाद. |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | श्री. ए.के.फटांगडे. |

**- न्यायनिर्णय -**

(घोषणा दिनांक – ०२.०५.२०२६)

आरोपीविरुध्द सदरचा खटला भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३ १४३, १४७ सह कलम १४९ अन्वये दोषारोप सिध्दतेकरीता चालविण्यात आला.

**०२.** अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की,

दि.२६/०६/२०२० रोजी दुपारी ०४.०० वा सुमारास मौजे अमरापुर ता.पैठण येथे शेत गट क्र.४९/२ मध्ये आरोपींनी शेताच्या बांधावर लोखंडी एगल लावण्याच्या कारणावरुन आरोपी क्र.१ याने फिर्यादीच्या भावाच्या डोक्यात मारुन डोके फोडुन जखमी केले. आरोपी क्र.२ याने लोखंडी सळईने फिर्यादीच्या नाकावर व पाठीवर मारहाण केली व आरोपी क्र.३ ते ५ यांनी लाकडी काठयाने व दांडयाने फिर्यादीच्या मुलगा व पुतण्या यांच्या पायावर पाठीवर मारहाण करुन जखमी करुन त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादीने पैठण पोलिस स्टेशन येथे जाउन सदरची फिर्याद दिली.

**०३.** सदर गुन्हयाचा तपास विद्या रमेश झिरपे, पो.उपनिरीक्षक यांनी केला. तसेच तपासकामी जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र, जप्ती पंचनामा, घटनास्थळाचा पंचनामा व इतर कागदपत्रे हस्तगत केली. तपासकामी त्यांनी साक्षीदारांची चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविले. तपासाअंती दोषारोपत्र सादर केले.

**०४.** आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३ १४३, १४७ सह कलम १४९ गुन्हा केल्याबद्दल दोषारोप निश्चित केले. सदर दोषारोप आरोपींना त्यांच्या भाषेत वाचुन व समजावून सांगितले. आरोपींनी गुन्हा मान्य नसल्याचे सांगूण संपररिक्षेस सामोरे जाण्याचे ठरविले.

**०५.** नि.क्र.०१ वरील आदेशाप्रमाणे आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जाबाब नोंदविण्यात आला नाही.

**०६.** सदर प्रकरणातील दोषारोप विचारात घेता पुढील मुद्दे माझ्या निदर्शनास आले व त्यांची कारणमिमांसा खालील प्रमाणे करण्यात आली:-

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २६/०६/२०२० रोजी मौजे. अमरापुर, ता. पैठण शेत गट क्र. ४९/२ मध्ये आरोपी क्र.१ ते ५ यांनी शेताच्या बांधावर लोखंडी एगल लावण्याच्या कारणावरुन समान उद्दीष्ट साद्य करण्यासाठी फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केली व गैरकायद्याची मंडळी जमवली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करुन व समान उद्दीष्ट साद्य करण्यासाठी दंगा करण्याचा प्रयत्न केला व त्याव्दारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नकारार्थी |
| ३. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्दीष्ट साद्य करण्यासाठी फावडे, लाकडी काठीने व लोखंडी सळईने फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ४. | वरील दिवशी दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने समान उद्दीष्ट साद्य करण्यासाठी फिर्यादीच्या भावाला, मुलाला व पुतण्याला चापट बुक्याने मारहाण करुन दुखापत पोहचवली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | | |
| **५.** | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>प्रश्न क्र.१ ते ४ करीता</u> -**

**०७.** मुद्दा क्रं. १ ते ४ एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्याच्या उद्देशाने मी मुद्दयाचे विवेचन करीत आहे.

**०८.** सदर साक्षीदार क्रं.१ शेख युनुस गफुर यांनी आपल्या साक्षेत असे नमुद केले आहे की, ते आरोपींना ओळखतात. ते त्यांचे नातेवाईक आहेत. दि.२०.०६.२०२० रोजी आरोपींसोबत त्यांचे किरकोळ वाद झाले होते. या व्यतिरिक्त काही एक घटना घडली नाही. असे काही घडले नाही की, खांब उपटण्याच्या कारणावरुन आरोपी क्र.१ ने त्यांच्या भावाच्या डोक्यात फावडे मारुन गंभीर जखमी केले व शिराज याणे त्यांना सळई मारुन पाठीत व नाकावर जखमी केले. सदर साक्षीदारानी अभियोग पक्षास सहाय न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांचा सखोल उलटतपास घेण्यात आला परंतु त्यात ही त्यांना यश आले नाही. एकंदरीतच फिर्यादीने दिलेली फिर्याद शाबित झालेली नाही.

**०९.** सदर साक्षीदार क्र.२ शेख ईस्माईल शेख गफुर यांनी त्यांच्या साक्षेत असे नमुद केले आहे की, ते आरोपींना ओळखतात. ते त्यांचे नातेवाईक आहेत. फिर्यादी हा त्यांचा भाऊ आहे. दि.२६.०६.२०२० रोजी आरोपींसोबत त्यांचे किरकोळ वाद झाले होते. या व्यतिरिक्त काही एक घडले नाही. असे काही घडले नाही की, खांबे उपटण्याच्या कारणावरुन आरोपीने त्यांच्या भावाच्या डोक्यात फावडे मारुन गंभीर जखमी केले व शिराज याणे त्यांना सळई मारुन पाठीत व नाकावर जखमी केले. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहाय न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांचा सखोल उलटतपास घेण्यात आला परंतु त्यात ही त्यांना यश आले नाही.

**१०.** सदर साक्षीदार क्र.३ सिकंदर ईस्माईल शेख यांनी त्यांच्या साक्षेत असे नमुद केले आहे की, ते आरोपींना ओळखतात. ते त्यांचे नातेवाईक आहेत. फिर्यादी हा त्यांचा चुलत आहे. दि.२६.०६.२०२० रोजी आरोपींसोबत त्यांचे किरकोळ वाद झाले होते. या व्यतिरिक्त काही एक घडले नाही. असे काही घडले नाही की, खांबे उपटण्याच्या कारणावरुन आरोपीने त्यांच्या वडीलांना व चुलते यांना फावडे मारुन गंभीर जखमी केले व शिराज याणे त्यांना सळई मारुन पाठीत व नाकावर जखमी केले. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहाय न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांचा सखोल उलटतपास घेण्यात आला परंतु त्यात ही त्यांना यश आले नाही.

**११.** सदर साक्षीदार क्र.४ जावेद युनूस शेख यांनी त्यांच्या साक्षेत असे नमुद केले आहे की, ते आरोपींना ओळखतात. ते त्यांचे नातेवाईक आहेत. फिर्यादी हे त्यांचे वडील आहे. दि.२६.०६.२०२० रोजी आरोपींसोबत त्यांचे किरकोळ वाद झाले होते. या व्यतिरिक्त काही एक घडले नाही. असे काही घडले नाही की, खांबे उपटण्याच्या कारणावरुन आरोपीने त्यांच्या वडील व चुलते यांना फावडे मारुन गंभीर जखमी केले व शिराज याणे त्यांना सळई मारुन पाठीत व नाकावर जखमी केले. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहाय न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांचा सखोल उलटतपास घेण्यात आला परंतु त्यात ही त्यांना यश आले नाही.

**१२.** सदर खटल्यादरम्यान फिर्यादी व आरोपी यांनी न्यायालयात हजर राहुन त्यांच्यातील वाद परस्पर सामंजस्याने न्यायालयाबाहेर मिटला असल्याचे कथन करुन त्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने समझोता पुरसिस सादर केली. परंतू फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२० प्रमाणे सदर खटला तडजोड करण्यास अयोग्य असल्याने सदर समझोता अर्ज विचारात न घेता खटला पुढे चालविण्यात आल. एकंदरीतच सदर प्रकरणातील समझोता अर्ज यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी व फिर्यादी यांच्यातील वाद परस्पर सामंजस्याने न्यायालयाबाहेर मिटलेले असल्याने त्यांना सदर खटला पुढे चालविणेत कसलेही स्वारस्य नाही.

**१३.** अभियोग पक्षाने सदर प्रकरणात सादर केलेले सर्व लेखी व तोंडी पुराव्यांचा एकत्रीतपणे विचार करता घटनेच्या दिवशी आरोपींनी समान उद्दीष्ट साद्य करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमवली व लाकडी काठीने, लोखंडी रॉडने, फावडयाने फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण केली. तसेच बेकायदेशिर जमवून दंगा केला तसेच फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ केली हे शाबीत करण्यास अभियोग पक्षाला अपयश आलेले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्रं.१ ते ४ चे नकारार्थी उत्तर देते.

**मुददा क्रं.५ साठी :-**

**१४.** ज्याअर्थी मुद्दा क्रं.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देण्यात आलेले आहेत, त्यावरुन स्पष्ट झालेले आहे की, अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप संशयापलीकडे सिध्द केलेले नाहीत, त्यामुळे आरोपी दोषमुक्त होणेस पात्र आहे. करिता, मुद्दा क्रं.५ चे उत्तराचे अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१. अहमद इब्राहिम शेख, आरोपी क्र.२ सिराज दुलेखॉ पठाण, आरोपी क्र.३ राजू अहमद शेख, आरोपी क्र.४ खाजा अहमद शेख व आरोपी क्र.५ निसार अहमद शेख यांची भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४७, ३२४, ३२३, सह कलम १४९ यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचा जामीन मुचलका रद्द करण्यात येतो.

३. जप्त मुद्देमाल एक लाकडी दांडा व बांबुची काठी, लोखंडी सळई, पांढऱ्या रंगाचे शर्ट अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

४. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७-अ नुसार प्रत्येकी १५ हजार रुपयाचे बंधपत्र द्यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HARIBHAU DASHARATH DESHINGE
Date: 2026.05.02 12:27:46 +0530

**(श्री.एच.डी.देशिंगे)**

**दिनांक –०२.०५.२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पैठण.**

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द-नि-शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : कोमल विजयसिंग बायस (ग्रेड-३ लघुलेखक) |
| न्यायालयाचे नाव | : सह-दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पैठण. |
| आदेशाची तारीख | : ०२.०५.२०२६ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०२.०५.२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : ०२.०५.२०२६ |